श्री.दीपक कपूर,भा.प्र.से. मुख्य कार्यकारी अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या परदेश दौऱ्यास मान्यतेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण विभाग
शासन निर्णय क्र. झोपुयो-१२०३/प्र.क्र४३/२०१८/झोपसु-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १९ मार्च, २०१८

<u>संदर्भ</u> :- १) मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा यांचे पत्र क्र.झोपुप्रा/प्रशा/कार्या-१/टे.२/११४/२०१८ दि.१७ फेब्रूवारी, २०१८.
२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परदौ-१४१४/प्र.क्र.४६/११ दि.२९ डिसेंबर,२०१४
३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परदौ-१४१६/प्र.क्र.११/११ दि.२ जून,२०१६
४) शासन पत्र समक्रमांक दिनांक १६ मार्च, २०१८.

<u>प्रस्तावना,</u>

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या संदर्भिय दि.१७ फेब्रूवारी, २०१८ च्या पत्रान्वये श्री.दीपक कपूर, भाप्रसे, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या जागतिक बँके तर्फे वॉशिंग्टन डी.सी., संयुक्त अमेरिका येथे Land And Poverty Conference साठी उपस्थित राहण्यासाठी, परदेश दौऱ्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. जागतिक बँकेने दि.८ फेब्रूवारी, २०१८ च्या पत्रान्वये श्री.दीपक कपूर, भाप्रसे, यांना वरील कॉन्फरन्ससाठी उपस्थित राहण्याचे आमंत्रण दिले आहे. या प्रयोजनासाठी होणारा सर्व खर्च जागतिक बँकेकडून करण्यात येणार आहे.

२. वरील प्रस्तावास अनुसरुन संदर्भिय शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दि. २९ डिसेंबर २०१४ व दि.२ जून, २०१६ मधील तरतुदीनुसार प्रस्तावास विभागाचे प्रभारी मंत्री यांची मान्यता घेण्यात आली. त्यानुसार विहित कार्यपध्दतीनुसार प्रस्तावास सामान्य प्रशासन विभागामार्फत शासन मान्यता घेण्यात आली. दरम्यानच्या कालावधीत जागतिक बँकने दि.२०/२/२०१८ च्या पत्रान्वये पाठविलेल्या प्रस्तावानुसार श्री.दीपक कपूर, भाप्रसे, यांच्या उक्त परदेश दौऱ्यास - Department of Economic Affairs, Ministry of Finance, Govt.of India ◦ यांच्या दि.२६/२/२०१८ च्या ई.मेल द्वारे संमती प्राप्त झाली आहे.

३. श्री.दीपक कपूर, भाप्रसे, यांच्या उपरोक्त दौऱ्याचा प्रस्ताव विहित नमुन्यात (Online FC-२ Form, EPC Form) संदर्भिय दि.१६/३/२०१८ च्या पत्रान्वये केंद्र शासनाच्या विविध मंत्रालयाकडे पाठविण्यात आला होता. त्यास अनुसरुन केंद्र शासनाच्या Ministry of External Affairs व Ministry of Home यांचेकडून **EPC १६०३१८२८३७२US** दिनांक १९.३.२०१८अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

<u>शासन निर्णय</u> :-

वरील सर्व वस्तुस्थिती विचारात घेवून श्री.दीपक कपूर, भाप्रसे,मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या दि. १९ मार्च, २०१८ ते दि. २२ मार्च, २०१८ (प्रवासाच्या कालावधीसह) या कालावधी मधील -जागतिक बँके तर्फे वॉशिंग्टन डी.सी., संयुक्त अमेरिका येथे Land And Poverty Conference साठी उपस्थित राहण्यासाठी ◦ परदेश दौऱ्यास मान्यता देण्यात येत आहे.

श्री दीपक कपूर, भा.प्र.से., मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई, यांनी त्यांच्या विदेश दौऱ्यासंबधिचा विस्तृत अहवाल गृहनिर्माण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागास सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२११५२१४४५७०९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Kishor Govind Pathade

Digitally signed by Kishor Govind Pathade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Housing Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=726d2037f6079adea28b13974a86a161d6bd207d40c09081cda096a0b4bd82a5, serialNumber=57cba7a0612a9f66d82de41da002a8575e53c67104ae2c0b0313b15b530b7544, cn=Kishor Govind Pathade
Date: 2018.03.21 15:23:32 +05'30'

(कि.गो.पठाडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव
२. मा.मंत्री (गृहनिर्माण)/ मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. श्री. दीपक कपूर, भा.प्र.से.मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व) मुंबई-५१
६. उप सचिव,गृहनिर्माण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
७. निवड नस्ती/ झोपसु-१